पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 08/11/2019 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## जबरी चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 6 कि.मी अंतरावर सिल्लेवाडा वार्ड क्र. 4 येथे फिर्यादी नामे– अंकित गणेशप्रसाद यादव, वय 23 वर्ष, रा. सिल्लेवाडा वार्ड नं 04, याने मित्रासह पार्टी केली तसेच मित्रांनी पार्टी केल्यानंतर ते आपआपले घरी निघुन गेले. दरम्यान दिनांक 06/11/2019 चे 23.00 वा. ते 23.30 वा. सुमारास आरोपी क्र. 1) प्रकाशनारायण उर्फ जॉन्टी सतदेव पांडे, वय 31 वर्ष, 2) लवकुश विनोद शुक्ला, वय 31 वर्ष व 3) अक्षय तुटेकर तिन्ही रा. सिल्लेवाडा यातीघांनी फिर्यादीशी दारूसाठी वाद घातला. तसेच आरोपीतांनी फिर्यादीच्या खिश्यातुन 500 रू बळजबरीने काढले व कोंडून ठेवले व मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 392, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 व 2 ला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. मनोज मेश्राम 9423775260 हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर माहुली शिवार येथे दिनांक 07/11/2019 चे 06:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– देवराव मधुकर मंगरूळकर, वय 39 वर्ष, रा. वार्ड क्र. 3, माहुली, ता. पारशिवनी यांच्या घराचे आत अज्ञात आरोपीने प्रवेश केला. तसेच आरोपीने घरामधील लोखंडी कोठीमध्ये ठेवलेल नगदी 47,000/–रू. व सोन्या–चांदीचे दागिने कि. 1,00,000/–रू. असा एकुण कि. 1,47,000/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री. उबाळे हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर मौजा माहुली शिवार येथे दिनांक 03/11/2019 चे 18:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– भरत वसंतराव गडकरी, वय 44 वर्ष, रा. आदर्श कॉलनी रामटेक, रेल्वे स्टेशन जवळ हे टेक्नेशियन दिनेश डडमल सह माहुली शिवार येथे इंडस टॉवर चेक करने करिता गेले होते. दरम्यान इंडस टॉवर क्र. 1249630 चे अज्ञात आरोपीने जाडी तोडुन आतमध्ये असलेल्या अमरराजा कंपनीच्या 2 व्होलटच्या 17 बॅटरी कि. 40,000/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नरेश रामटेके 8830332007 हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर तारबाजार नगर परिषद सार्वजनीक शौचालय जवळ, काटोल येथे दिनांक 06/11/2019 चे 17:30 वा. ते 15:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विजय भगवान मेश्राम, वय 30 वर्ष, रा. वंडली हे एमएच–40/एए–4661 क्रमांकाची निळया रंगाची हिरो होन्डा मोटरसायकलने भाजीपाला खरेदीकरीता तारबाजार काटोल येथे गेले होते. यानंतर फिर्यादीने नगर परिषदचे सार्वजनीक शौचालय जवळ गाडी उभी करून ठेवली असता अज्ञात आरोपीने फिर्यादीची किंमती 12,000/– रू. गाडी चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक संतोष आंधळे हे करीत आहे.

## चोरीचा प्रयत्न

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर श्रीकृष्णा बॅक समोर येथे दिनांक 07/11/2019 चे 01:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुनिल विठ्ठल मैदीले, वय 44 वर्ष, रा. आझाद चौक, भिवापुर हे पानठेल्यावर सिगरेट पित असतांना आरोपी नामे– दिपक दतुजी व्यास, वय 42 वर्ष, रा. कांपा, ता. नागभिड जि. चंद्रपुर हा फिर्यादीच्या मोटरसायकला आपल्या खिश्यातुन चाबीचा गुच्छा काढुन फिर्यादीच्या गाडीला लावतांनी दिसला. फिर्यादी माटरसायकल कडे गेल्याने सदरचा आरोपी हा पळु लागला. फिर्यादीने त्याचा पाठलाग करुन पकडले असता त्यानी उडवा उडवीचे उत्तर दिले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 379, 511 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार चंद्रकांत रेवतकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर